(57)

"आधार" क्रमांक नोंदणीकरिता
पडताळणी कर्त्यांची नियुक्ती करणेबाबत.

Copy Issued Inder
Right to information act

**महाराष्ट्र शासन**
सामान्य् प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : मातंस/१२११/प्र.क्र.३/३९
मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
दिनांक : २३/१२/२०११

वाचा : १) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ७१/ दि. ०९/०९/२०१०

२) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ४८/ दि. २८/०१/२०११

३) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. १०९/ दि. २४/०२/२०११

४) शासन निर्णय, सामान्य् प्रशासन विभाग क्र. मातंस २०१०/प्र.क्र. ३ / ३९ दि. ०५/०३/२०११

५) केंद्रशासन, युआयडी एआय चे पत्र क्र (फ) ४ (४)/५७/ २८/२०१०-आर ओबी
दि. २० डिसेंबर २०११

## परिपत्रक

"आधार" क्रमांकासाठी रहिवाशांच्या ओळख पटविणे आणि त्या अनुषंगाने सादर करावयाच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची पडताळणी कर्ता म्हणुन नियुक्ती करण्याचा निर्णय क्र. १ ०९/०९/२०१० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. सदर कर्मचारी संपूर्ण नोंदणी केंद्रावर उपस्थित राहू शकत नाहीत. परिणाम स्वरुप नोंदणीचे काम अपेक्षित गतीने होत नसल्याचे निदर्शनाला आले म्हणुन क्रमांक ४ वरील दि. ०५/०३/२०११ च्या शासन निर्णयान्वये कागदपत्र पडताळणीचे काम नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकाकडे सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकांकडून कागदपत्र पडताळणीच्या कामात अनेक गंभीर स्वरुपाच्या चुका होत असल्याचे आढळून आलेले आहे. तसेच दि. २० डिसेंबर २०११ यु.आय.डी.ए.आय. च्या नवी दिल्ली यांच्या संदर्भाधिन कार्यालयीन आदेशान्वये नोंदणी केंद्राच्या पर्यवक्षमार्फत कागदपत्राची पडताळणी न करता शासकीय कर्मचारी/निवृत्त शासकीय कर्मचारी

WS-5
7/1/12

59

Copy Issued Inder
Right to information act

यांच्या मार्फत करावी असे आदेश निर्गमीत केले आहेत. सदरील चुका टाळून आधार क्रमांकाचे नोंदणीतील दोष दूर करण्याकरिता आता खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) आधार क्रमांकाच्या नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीचे काम यापुढे नोंदणी केंद्राच्या पर्यवेक्षकांकडून करण्यात येऊ नये.

२) आधार क्रमांकाच्या नोंदणीसाठी सादर केलेल्या कागदपत्राच्या पडताळणीसाठी निबंधकानी (जिल्हाधिकारी /महानगर पालिका आयुकृत ) आपल्या नियंत्रणातील कर्मचाऱ्यांची पडताळणीकर्ता म्हणून नियुक्ती करावी. पडताळणी कामकाजाकरिता कर्मचारी अपुरे पडत असतील तर निवृतृत कर्मचाऱ्यांची या कामाकरिता नियुक्ती करावी.

३) कागदपत्रांच्या पडताळणीकरिता दि. ०५/०३/२०११ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचा उपयोग करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक क्रमांक 201112231007091 2100 / असा आहे.

( डॉ. संतोष भोगले)
अवर सचिव (माहिती व तंत्रज्ञान )

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त

२) सर्व जिल्हाधिकारी/महानगर पालिका आयुकृत

३) सर्व नोंदणी संस्था